Ref. No.: CML/42/2024-25/NSE

Date: 09th September, 2024

**To,**
**The Manager - Listing Compliance**
**National Stock Exchange of India Limited**
**Exchange Plaza, Plot No. C-1, Block-G,**
**Bandra Kurla Complex, Bandra (E),**
**Mumbai-400051**

**Company Symbol: CMNL**

Dear Sir/Madam,

**Subject: Publication of Notice of Remote e-voting regarding Annual General Meeting (AGM) to be held on 30th September, 2024.**

We hereby inform that we have published the Notice regarding remote e-voting in Marathi and English Edition newspapers on 09th September, 2024.

Please find enclosed herewith a copy of the paper clippings of the same.

We request you to take the above information on your records and disseminate the same on your respective website.

Thanking You,

Yours faithfully,
**For CHAMAN METALLICS LIMITED**

**Rahul Relwani**
**Company Secretary and Compliance Officer**

CHAMAN METALLICS LIMITED TADALI M.H.

Rahul Relwani
Digitally signed by Rahul Relwani
Date: 2024.09.09 13:44:00 +05'30'

## निधन वार्ता

### शेवंताबाई मुसळे



**बिबी :** सांगोडा येथील माजी सरपंच वामन पा.मुसळे यांच्या मातोश्री शेवंताबाई देविदास मुसळे (८५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांचापश्चात एक मुलगा, एक मुलगी, जावई, सून, नातवंड असा बराच मोठा आप्तपरिवार आहे.

### तुळशीराम भोगेकर



**वरोरा :** सेवानिवृत्त तहसीलदार तुळशीराम शिवाजी भोगेकर (८७, रा. हनुमान वॉर्ड, वरोरा) यांचे ७ सप्टेंबरला वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुले, मुली, सुना, नातवंडे असा मोठा आप्त परिवार आहे. त्यांच्यावर वरोरा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

### अभय कऱ्हाडे



**अऱ्हेरनवरगाव :** विकास विद्यालय, अऱ्हेरनवरगाव येथे शिपाई पदावर कार्यरत असलेले गावचे रहिवासी अभय त्र्यंबक कऱ्हाडे (५०) यांचे ७ सप्टेंबरला निधन झाले. त्यांच्यापश्चात पत्नी, चार मुली आणि बराच मोठा आप्तपरिवार आहे.

### सखाराम बोरकुटे



**गोवरी :** राजुरा येथील रामनगर कॉलनीमधील रहिवासी सेवानिवृत्त मुख्याध्यापक सखाराम जगन्नाथ बोरकुटे (८३) यांचे रविवारी (दि. ८) सकाळी ११ वाजता वृद्धापकाळाने राहते घरी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, सुना, नातवंडे, असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर राजुरा येथील मोक्षधामात सायंकाळी ५ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.

### दयाराम गणवीर

**भेजगाव :** येथील दयाराम बोधुजी गणवीर (८५) यांचे आज (दि.८) आजाराने चंद्रपूर येथील शासकीय महाविद्यालय निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, सुन, नातवंड असा बराच मोठा आप्तपरिवार आहे.

# सहा वर्षे झाले; पोंभूर्णा बस स्थानक केव्हा पूर्ण होणार?

## सहा वर्षांत चार ठेकेदार बदलले अन् काम रखडले

लोकमत न्यूज नेटवर्क

**पोंभूर्णा :** पोंभूर्णा येथे सुसज्ज व अद्ययावत बस स्थानकाचे सहा वर्षांपूर्वी भूमिपूजन करण्यात आले. काही प्रमाणात बांधकाम झाले. सांगाडा उभारण्यात आला; मात्र त्यापुढे बस स्थानकाचे काम काही पुढे गेले नाही. ड्रिम प्रोजेक्ट असलेल्या अद्ययावत पोंभूर्णा बस स्थानक बंद अस्वस्थेत असून, आतापर्यंत चार बांधकाम करणारे कंत्राटदार काम सोडून निघून गेले. त्यामुळे हायटेक बस स्थानक केवळ ड्रॉइंग शिटवरच काढलेले आहे. यामुळेच प्रवाशांना जुन्या बस स्टँड चौकात उघड्यावर ताटकळत उभे राहावे लागत आहे.

सहा वर्षांपासून रखडलेल्या या बस स्थानकाचे बांधकाम कधी पूर्ण होणार, याकडे तालुकावासीयांचे आता लक्ष लागले आहे. ७ करोडो ५० लक्ष रुपये खर्च करून सुख-सुविधायुक्त अशा हायटेक बस स्थानकाचे भूमिपूजन २१ डिसेंबर २०१८ ला करण्यात आले. ज्या-ज्या ठेकेदारांना बांधकामाचे कंत्राट मिळाले, ते सर्व ठेकेदार दोन-तीन महिन्यांचे काम करून रफुचक्कर होत गेले. आतापर्यंत या बस स्थानकाच्या बांधकामासाठी चार ठेकेदार बदलले. पण, काम मात्र अपूर्णच आहे. बांधकामही बंद पडले आहे. बस स्थानक उभे केले जात असताना, याकडे खुद्द एसटी महामंडळाचेच डोळेझाक झाले असल्याने बांधकामाचा पूर्णतः बट्ट्याबोळ उडाला आहे. प्रवाशांना उत्तम सोयी-सुविधायुक्त अशा अत्याधुनिक बस स्थानकाचा फक्त सांगाडा उभा आहे. अर्धवट झालेल्या बांधकामावर झाडे झुडुपे उगवली असून, बांधकामासाठी वापरलेल्या लोखंडी साहित्यास जंग लागले आहे. ते वापरण्यायोग्य नसल्याचे बोलले जात आहे. याकडे गंभीरतेने बघणे गरजेचे झाले आहे.



पोंभूर्णा येथील अर्धवट असलेले बसस्थानक.

### जुने बस स्थानकही तोडले

तालुका निर्मितीला तब्बल २५ वर्षे झाले असले, तरी पोंभूर्ण्यात अद्यापही नवीन बस स्थानक बांधण्यात आले नाही. उलट सात वर्षांअगोदर राज्य महामार्गाच्या नावावर शहरातील जुने बस स्टॉप तोडून टाकण्यात आले होते. यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. प्रवाशांना उन्हात बसून एसटीची वाट पाहावी लागत असल्याचे चित्र आहे.

# नागभीड स्थानकावर रेल्वे येताच सर्वच झाले प्रफुल्लित

लोकमत न्यूज नेटवर्क

**नागभीड :** ९ ऑगस्ट २०२३ पासून अनिश्चित काळासाठी बंद करण्यात आलेली वडसा-चांदा फोर्ट ही सकाळची रेल्वे गाडी रविवारपासून नियमित सुरू करण्यात आली. नागभीड रेल्वे स्थानकावर या जल्लोषात स्वागत करण्यात आले.

ही गाडी सकाळी १० वाजता चंद्रपूरला पोहोचत असल्याने वडसा, ब्रह्मपुरी, नागभीड, सिंदेवाही व मूल तालुक्यांतील नागरिक व चाकरमान्यांसाठी ही गाडी अतिशय महत्त्वाची होती. ही गाडी चंद्रपूरला सकाळी १० वाजता पोहोचत असल्याने सामान्य प्रवासी, नागरिक आणि चाकरमानी याच गाडीने प्रवास करीत होते.

मात्र, रेल्वे विभागाने ९ ऑगस्ट २०२३ पासून ही गाडी अनिश्चित काळासाठी बंद केली होती. त्यामुळे प्रवाशांमध्ये तीव्र संताप व्यक्त करण्यात येत होता. ही गाडी सुरू करावी म्हणून स्थानिकांकडून निवेदने देण्यात आली. मात्र त्याचा काहीच उपयोग होत नव्हता. शेवटी या भागाचे खासदार डॉ. नामदेव किरसान यांनी नुकत्याच झालेल्या लोकसभा अधिवेशनात या रेल्वे गाडीचा प्रश्न उपस्थित केला आणि ही गाडी सुरू करण्याची मागणी केली. अखेर रेल्वे विभागाने ही मागणी मान्य केली.

रविवारी या गाडीचे नागभीड रेल्वे स्थानकावर आगमन होताच स्वागत करण्यात आले. यावेळी खासदार डॉ. नामदेव किरसान, जि. प.चे माजी अध्यक्ष डॉ. सतीश वारजूकर, महेंद्र ब्राह्मणवाडे, तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रमोद चौधरी, प्राचार्य डॉ. अमीर धमाणी, न. प.चे माजी गटनेते दिनेश गावंडे, माजी नगरसेवक प्रतीक भसीन उपस्थित होते. यावेळी गाडीचे चालक व सहायक यांचा सत्कार करण्यात आला. यानंतर खासदार डॉ. नामदेव किरसान यांनी या गाडीस हिरवा झेंडा दाखवून रवाना केली.



हिरवी झेंडी दाखवून रेल्वेला चंद्रपूरकरिता रवाना करताना खा. नामदेव किरसान.

# ...अखेर मॉर्निंग ग्रुपच्या सदस्यांनी बुजविले त्या मार्गावरील खड्डे

लोकमत न्यूज नेटवर्क

**मूल :** पावसामुळे मूल-चंद्रपूर मार्गावर मोठमोठे खड्डे पडले आहेत. त्या खड्ड्यांमुळे दररोज अपघात होत असून, अनेकांचा अपघातात बळी गेला, तर अनेकजण किरकोळ जखमी झाले. त्यामुळे या मार्गावरील खड्डे बुजविण्यात यावे, अशी नागरिकांनी मागणी केली. मात्र, खड्डे बुजविण्यासाठी सार्वजनिक बांधकाम दुर्लक्ष करीत असल्याने मूल येथील मॉर्निंग ग्रुपच्या सदस्यांनी सामाजिक दायित्वातून महामार्गावरील खड्डे बुजविले.

मूल-चंद्रपूर या महामार्गाचे राज्यासह परराज्यातही कच्चा मालाची वाहतूक करणारी मोठे ट्रक व जड वाहने ये-जा करतात. तसेच, ब्रम्हपुरी, गडचिरोली, नागपूरला जाणारी प्रवास वाहने याच मार्गाने जात असतात. त्यामुळे हा महामार्ग मोठ्या वर्दळीचा असून, दररोज जड वाहतूक करणारी शेकडो वाहनांची मोठी रेलचेल असते. पावसामुळे या मार्गावर अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असल्याने दररोज दुचाकी, चारचाकी वाहनांचे अपघात होत आहेत. अपघातात आतापर्यंत अनेक जणांचा बळी गेला आहे, तर अनेक जण किरकोळ जखमी झाले आहेत. मात्र, झोपेचे सोंग घेतलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाला जाग येत नसल्याने अखेर मॉर्निंग ग्रुपच्या सदस्यांनी एकत्र येऊन त्या खड्ड्यांमुळे कुणाचा जीव जाऊ नये, यासाठी मार्गावरील खड्डे बुजविले.



स्वतः खड्डे बुजविताना नागरिक.

## वाढोणा येथे होणार महिला सभागृह

लोकमत न्यूज नेटवर्क

**सावरगाव :** नागभीड तालुक्यातील वाढोणा येथे खासदार स्थानिक विकास निधीअंतर्गत महिला सभागृह बांधकामाला सुरुवात करण्यात आली.

सरपंच देवेंद्र गेडाम यांच्या हस्ते नारळ फोडून बांधकाम सुरू करण्यात आले. नागभीड तालुक्यातील वाढोणा हे गाव लोकसंख्येच्या बाबतीत तालुक्यातील दुसऱ्या क्रमांकाचे मोठे गाव असून, साधारणत: सात हजारांच्या वर या गावाची लोकसंख्या आहे. या गावांमध्ये महिलांना कुठलेही कार्यक्रम किंवा छोटेखानी सभा, बैठका घेण्यासाठी हक्काची इमारत उपलब्ध नव्हती. त्यामुळे ही बाब ओळखून येथील सरपंच देवेंद्र गेडाम यांनी खा. डॉ. नामदेव किरसान यांना वाढोणा येथे महिला सभागृह इमारतीची मागणी केली होती. या महत्त्वपूर्ण बाबीचा विचार करून खा. डॉ. किरसान यांनी विशेष करून महिलांची महत्त्वाची समस्या विचारात घेऊन सरपंच गेडाम यांच्या मागणीला प्राधान्य दिले आणि महिला सभागृहाची इमारत मंजूर केली. या सभागृहाच्या बांधकामासाठी नऊ लाख ९२ हजार रुपयांचा निधी मंजूर आहे. यावेळी उपसरपंच भगवान बन्सोड, अनिल डोर्लीकर, प्रदीप येसनसुरे आदी उपस्थित होते.

# गणेशोत्सवासाठी त्यांचे निर्माल्य संकलन

## रोटरी व आनंदवन मित्र मंडळाचा उपक्रम



संकलन केंद्रात हरितालिकेला निर्माल्य टाकण्यासाठी आलेल्या महिला

लोकमत न्यूज नेटवर्क

**वरोरा :** सार्वजनिक गणेशोत्सवादरम्यान शहरात होणारे जलप्रदूषण रोखण्यासाठी तसेच पर्यावरणाभिमुख गणेशोत्सवाचे महत्त्व पटवून देण्यासाठी रोटरी क्लब, वरोरा व आनंदवन मित्र मंडळ, वरोरा यांच्या संयुक्त विद्यमाने निर्माल्य संकलन उपक्रम राबविण्यात येत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील महर्षी वाल्मिकी प्रवेशद्वारालगत निर्माल्य संकलन वाहनांच्या माध्यमातून निर्माल्य संकलन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या उपक्रमाचा शुभारंभ येथील उपजिल्हा रुग्णालयचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रफुल्ल खुजे यांच्या हस्ते नारळ फोडून करण्यात आला. याप्रसंगी रोटरी क्लब वरोराचे अध्यक्ष बंडू देऊळकर, अभिजित मणियार, समीर बारई, दामोदर भासपले, मनोज जोगी, आनंदवन मित्र मंडळ, वरोराचे अध्यक्ष डॉ. प्रवीण मुधोळकर, राजेंद्र मर्दाने, राहुल देवडे, रवींद्र नलगिंटवार, खेमचंद नेरकर, विवेक बर्वे, उपस्थित होते. यावेळी मंडळाच्या आवाहनाला प्रतिसाद देत हरितालिका विसर्जनासाठी आलेल्या महिलांनी निर्माल्य संकलन वाहनात निर्माल्य जमा केले.

## राजुरा न.प.ने वाढविला मनमानी कर

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजुरा :** नगर परिषदेने इतर नगर परिषद व नगरपंचायतींची कर प्रणाली पाहता अचानकच त्यांच्यापेक्षा तिपटीने राजुरा शहरातील नगर परिषद क्षेत्रातील रहिवासी व व्यावसायिक इमारतींवर करवाढ करण्यात आलेली आहे. ज्यामुळे व्यावसायिक, तसेच सामान्य नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर आक्रोश व नगर परिषदेच्या निर्णयाविरोधामध्ये असंतोष उफाळत आहे.

खरे पाहता दर चार वर्षांनी दहा टक्के कर वाढवावा, हे अपेक्षित असतानादेखील तसे न करता राजुरा नगर परिषदेने ४० टक्के कर वाढ करून सामान्य जनतेवर, व्यापाऱ्यांवर मोठा आर्थिक डाका टाकला आहे, असा आरोप सूरज ठाकरे यांनी केला आहे. आधीच सामान्य जनता ही महागाईने त्रस्त झालेली असून, विधानसभा क्षेत्रातील शासकीय आरोग्य सुविधा व शैक्षणिक सुविधा या व्हेंटिलेटरवर आहे. सामान्य जनतेचा व मध्यमवर्गीयांचा तसाच व्यापाऱ्यांचा कमाईचा खूप मोठा हिस्सा या सर्व बाबींवर खर्च होत आहे, तसेच दैनंदिन गरजांच्या वस्तूंच्या वाढत असलेल्या किमतींमुळेही जनता त्रस्त आहे. त्यात राजुरा नगर परिषदेने घेतलेला हा निर्णय अन्यायकारक असून तो रद्द करावा, अशी मागणी सूरज ठाकरे यांनी निवेदन देऊन केली आहे.


## चमन मेटालिक्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालयः ए-२६, एम.आय.डी.सी, तडाली ग्रोथ सेंटर, तडाली, चंद्रपूर (महा.) ४४२४०६
कॉर्पोरेट कार्यालयः अग्रवाल कॉम्पलेक्स, पांडे नर्सिंग होम समोर, समता कॉलनी, रायपूर (छग.) ४९२००१, संपर्क क्र.: ०७७१-४२५९१००
ई-मेलः cs@cmlgrgroup.com वेबसाईटः www.cmlgrgroup.com
CIN:L27100MH2003PLC143049

### २१वी वार्षिक सर्वसाधारण सभा आणि ई-व्होटिंग माहितीची सूचना

एतद्द्वारे सूचना देण्यात येते की;
१. चमन मेटालिक्स लिमिटेड (दी कंपनी) ची २१वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम किंवा सभा) ही एजीएम बोलावण्याच्या सूचनेमध्ये दिल्यानुसार व्यवसाय व्यवहाराकरिता नॅशनल सेक्युरीटीज डीपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) यांचेद्वारे पुरविण्यात आलेल्या व्हीडीओ कॉन्फरसिंग (व्हीसी)/ इतर दृकश्राव्य (ऑडिओ व्हिज्युअल) साधने (ओएव्हीएम) सूविधे मार्फत सोमवार, ३० सप्टेंबर २०२४ ला दु. १२:३० वा. (भाप्रवे) ला घेण्यात येईल. कंपनीज ॲक्ट, २०२३ (दी ॲक्ट), कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय (एमसीए) परिपत्रक क्र. १४/२०२० दिनांक ०८ एप्रिल २०२०, १७/२०२० दिनांक १३ एप्रिल २०२०, २०/२०२० दिनांक ०५ मे २०२० आणि एमसीएद्वारे या संदर्भात जारी करण्यात आलेले नंतरचे परिपत्रक, अद्यावत ०९/२०२३ दिनांक २५ सप्टेंबर २०२३ (सामूहिकपणे 'एमसीए परिपत्रक' म्हणून उल्लेखित) आणि सेक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडीया (सेबी) व्दारे जारी परिपत्रक दिनांक १२ मे २०२० आणि १५ जानेवारी २०२१, १३ मे २०२२, ०५ जानेवारी २०२३, ०६ ऑक्टोंबर २०२३ आणि ०७ ऑक्टोंबर २०२३ अनुक्रमे (सामूहिकपणे 'सेबी' परिपत्रक म्हणून उल्लेखित), (सामूहिकपणे 'संबध्द परिपत्रक म्हणून उल्लेखित) आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिसक्लोजर रीक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ (सेबी एलओडीआर) च्या सर्व लागू तरतूदींचे अनुपालन करून, कंपनीने वित्तीय वर्ष २०२३-२४ करिता वार्षिक अहवाल (ॲन्युअल रीपोर्ट) ॲक्सेस करण्यासाठी वेब लिंकसह कंपनीच्या २१ व्या एजीएमची सूचना शनिवार, ०७ सप्टेंबर २०२४ ला ज्यांचे ई-मेल पत्ते कंपनी/ रजिस्ट्रार्स आणि ट्रान्सफर एजंट (आरटीए)- लिंक इन टाइम इंडीया प्रायव्हेट लिमिटेड/ डीपॉझिटरीज/ डीपॉझिटरी पार्टीसिपंट यांचेकडे नोंदणीकृत आहेत अशा सदस्यांना केवळ इलेक्ट्रॉनिक पध्दतीने पाठविण्यात आली आहे. २. वित्तीय वर्ष २०२३-२४ करिता वार्षिक अहवालासह एजीएमची सूचना कंपनीची वेबसाईट www.cmlgrgroup.com वर, एनएसडीएलची वेबसाईट www.evoting.nsdl.com वर आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड (एनएसई) ची वेबसाईट www.nseindia.com वर उपलब्ध आहे. (अ) सभेपूर्वी रीमोट ई-व्होटींग, (ब) व्हीसी/ओएव्हीएम मार्फत सभेमध्ये भाग घेणे आणि जुळणे, (क) सभेदरम्यान ई-व्होटिंग, आणि (ड) ई-मेल आयडीची नोंदणी यावरील विस्तृत मार्गदर्शन एजीएमच्या सूचनेमध्ये उपलब्ध आहे. ३. सुदुर (रीमोट) ई-व्होटिंगः कंपनीज (व्यवस्थापन व प्रशासन) रूल्स २०१४ च्या रूल २० सह वाचल्या जाणाऱ्या अधिनियमाचे सेक्शन १०८, एमसीए/ सेबीच्या इतर लागू परिपत्रकासह वाचल्या जाणाऱ्या सेबी एलओडीआरचे रेगुलेशन ४४ चे अनुपालन करून, कंपनी आपल्या सदस्यांना एजीएम सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार व्यवहार करावयाच्या व्यवसाया संदर्भात एजीएम पुर्वी सूदुर ई-व्होटिंग करण्याची सूविधा तसेच एजीएममध्ये ई-व्होटींगची सुविधा देत आहे आणि या उद्देशाकरिता, कंपनीने इलेक्ट्रॉनिक साधना मार्फत व्होटिंग सुविधाजनक करण्याकरिता एनएसडीएलला नियुक्त केले आहे. सुदुर ई-व्होटींगकरिता सविस्तर सूचना एजीएम बोलाविण्याच्या सूचनेमध्ये दिलेली आहे. सदस्यांना विनंती आहे की त्यांनी खालील ध्यानात घ्यावेः
**अ. सुदूर ई-व्होटिंग सुविधा शुक्रवार, दि. २७ सप्टेंबर २०२४ ला सकाळी ०९:०० वा. (भाप्रवे) सुरू होईल आणि रविवार, दि. २९ सप्टेंबर २०२४ ला साय. ०५:०० वा. (भाप्रवे) समाप्त होईल. त्यानंतर मतदानाकरिता सुदूर ई-व्होटिंग मॉड्यूल एनएसडीएलद्वारे निष्क्रीय करण्यात येईल आणि सदस्यांना उक्त तारीख आणि वेळेनंतर सुदूर ई-व्होटिंगच्या माध्यमातून इलेक्ट्रॉनिकली मतदान करण्याची परवानगी राहणार नाही.** ब. सदस्यांचे मतदान अधिकार सोमवार, **दि. २३ सप्टेंबर २०२४** (कट ऑफ डेट) रोजीनुसार कंपनीच्या भरणा केलेल्या इक्विटी शेअर भांडवलाच्या त्यांच्या शेअरच्या प्रमाणात राहतील. सदस्यांना एजीएममध्ये व्हीसी/ओएव्हीएम कार्यवाहीदरम्यान इलेक्ट्रॉनिक व्होटिंग सिस्टमच्या माध्यमातून मतदानासाठी सुविधा प्रदान करण्यात येईल आणि एजीएममध्ये सहभागी होणारे सदस्य, ज्यांनी सूदूर ई-व्होटिंगद्वारे ठरावा(रिझोलूशन)वर याआधी आपले मतदान केलेले नाही, ते अध्यक्षाच्या घोषणेनंतर या ठरावावर मतदान करण्यासाठी आपल्या अधिकाराचा वापर करण्यास पात्र असतील. ज्या सदस्यांनी एजीएमच्या आधी सुदूर ई-व्होटिंगद्वारे ठरावावर आपले मत दिलेले आहे, ते सूद्धा व्हीसी/ओएव्हीएमच्या माध्यमातून एजीएममध्ये सहभागी होण्यास पात्र असतील, परंतु त्यांना पुन्हा या ठरावावर मतदान करण्याचा अधिकार राहणार नाही. एजीएमच्या दिवसी सूदूर ई-व्होटिंग मॉड्यूल सभेच्या समारोपानंतर १५ मिनिट मतदान करण्यासाठी एनएसडीएलद्वारे निष्क्रीय करण्यात येईल. क. कोणतेही शेअरहोल्डर्स ज्यांनी कंपनीचे शेअर्स घेतलेले आहेत आणि नोटीस पाठविल्यानंतर कंपनीचे सदस्य बनलेले आहेत आणि शेवटची तारीख (कट ऑफ डेट) अर्थात सोमवार, २३ सप्टेंबर २०२४ रोजी शेअर्स धारण करीत आहेत, त्यांनी evoting@nsdl.com वर एक विनंती पाठवून यूजर आयडी व पासवर्ड प्राप्त करावे. तथापि, जर एकादी व्यक्ती सुदूर ई-व्होटिंगकरिता एनएसडीएलकडे याआधीच नोंदणीकृत असेल, तर सदस्य मतदान करण्यासाठी आपल्या विद्यमान यूजर आयडी व पासवर्डचा वापर करु शकेल. ड. एखादी व्यक्ती शेवटच्या तारखेला रोजी सदस्य नसेल तर त्यांनी ही नोटीस केवळ माहितीकरिता आहे असे समजावे. ज्या सदस्याचे नाव सदस्यांच्या रजिस्टरमध्ये किंवा शेवटच्या तारखेला डिपॉजिटर्सद्वारे सांभाळलेल्या लाभार्थी मालकलांच्या रजिस्टरमध्ये नोंदविले आहे, त्यांना केवळ एजीएमपूर्वी सुदूर ई-व्होटिंग सूविधेचा तसेच एजीएममध्ये ई-व्होटिंगचा लाभ घेण्याचा अधिकार राहिल. ई. ई-व्होटींग संबंधीत कोणत्याही शंका/तक्रारी असल्यास, सदस्य/लाभार्थी मालकांनी www.evoting.nsdl.com च्या ''डाऊनलोड'' सेक्शनमध्ये उपलब्ध शेअरहोल्डर्सकरिता नेहमी विचारण्यात येणारे प्रश्न ('एफएक्यू') आणि शेअरहोल्डर्सकरिता ई-व्होटिंग यूजर मॅन्युअल पाहावे किंवा ०२२-४८८६ ७००० वर कॉल करावा किंवा evoting@nsdl.com वर एक विनंती पाठवावी किंवा श्री. अमित विशाल, सहायक उपाध्यक्ष किंवा सूश्री पल्लवी म्हात्रे, वरिष्ठ व्यवस्थापक, एनएसडीएल यांच्याशी, नामित ईमेल आयडीः amitv@nsdl.com व pallavid@nsdl.com वर संपर्क साधावा.
एनएसडीएलचा पत्ता, प्लॉट सी-१ ब्लॉक जी, एक्सचेंज प्लाझा, बांद्रा - कुर्ला कॉम्पलेक्स, मुंबई, महाराष्ट्र ४०००५१ आहे. फ. डीपॉजिटरीज मार्फत लॉगिनशी संबंधित कोणत्याही तांत्रिक बाबीकरिता डीमॅट मोडमधील प्रतिभूती धारण केलेले शेअरहोल्डर्स (अ) एनएसडीएल सोबत प्रतिभूती धारण केलेले सदस्यांनी एनएसडीएल हेल्पडेस्क evoting@nsdl.com वर विनंती पाठवून संपर्क करावा किंवा ०२२-४८८६ ७००० वर संपर्क करावा. (ब) सीडीएसएल सोबत प्रतिभूती धारण केलेले सदस्यांनी सीडीएसएल हेल्पडेस्क helpdesk.evoting@cdslindia.com वर विनंती पाठवून संपर्क करावा किंवा १८००-२१-०९९११ वर संपर्क करावा.

स्थानः रायपूर
दिनांकः ०९ सप्टेंबर २०२४

कृते चमन मेटालिक्स लिमिटेड
स्वा/- राहुल रेलवानी, कंपनी सचिव


# नांदगावातील किराणा दुकानातून दारू विक्री

लोकमत न्यूज नेटवर्क

**घोसरी :** मूल पोलिस ठाण्यांतर्गत बेंबाळ चौकीच्या हद्दीतील अनेक गावांसह नांदगाव येथील गजबजलेल्या चौकातील आमने-सामने असलेल्या किराणा दुकानातून व पानटपरीवर राजरोसपणे अवैध दारू विक्री केली जात आहे. मात्र, पोलिसांचे याकडे दुर्लक्ष होत आहे.

नांदगाव येथे हाकेच्या अंतरावर असलेल्या घोसरी येथे परवानाधारक देशी दारूचे दुकान अस्तित्वात आहे, तरीही नांदगाव येथील पानटपरीवर, तसेच नांदगाव येथील किराणा दुकानातून अवैधरीत्या देशी दारूची खुलेआम विक्री होताना दिसत आहे. एवढेच नव्हे, तर मद्यपींना दारू पिण्यासाठी पाण्याची सोयसुद्धा उपलब्ध आहे.

त्यामुळे मद्यपी देशी दारू दुकानातील अंतर कापण्यापेक्षा जादा दरातील अवैध दारू विक्रीकडे ओढलेले दिसत आहेत. सदर अवैध दारू विक्रीमुळे किराणा घेण्यासाठी येणाऱ्या महिलांना मोठ्या प्रमाणात मनस्ताप सहन करावा लागत आहे. एवढेच नव्हे, तर शाळकरी, तसेच लहान मुलांसमोर होणाऱ्या दारू विक्रीमुळे निरागस मुलांवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता बळावलेली आहे.

नांदगाव येथील अवैध दारू विक्रीवर पोलिसांनी वेळीच पायबंद घालावा, अशी मागणी होत आहे.

# ११ गावांत 'एक गाव एक गणपती'

लोकमत न्यूज नेटवर्क

**सिंदेवाही :** गावाची एकता व गावाची एकात्मता कायम राखण्यासह आदर्श गावाच्या निर्माणासाठी शासनाने मागील काही वर्षांपासून 'एक गाव एक गणपती' योजना सुरू केली आहे. योजनेनुसार सिंदेवाही तालुक्यातील तब्बल ११ गावांत 'एक गाव एक गणपती'ची स्थापना केली गेली.

ही माहिती सिंदेवाही पोलिस विभागातर्फे देण्यात आली. तालुक्यातील ९२ गावांमध्ये मोठ्या उत्साहात गणेश उत्सव साजरा केला जातो. एकाच गावात एकापेक्षा अधिक गणेश मूर्तींची स्थापना झाल्यास गावाची एकता व एकात्मतेसह कायदा व सुव्यवस्था कायम राखण्यात शासन व प्रशासनाला विविध अडचणींचा सामना करावा लागतो. या स्थितीत शासनाने मागील काही वर्षांपूर्वी ग्रामीण भागात 'एक गाव एक गणपती' योजना सुरू केली. या योजनेअंतर्गत विविध गावांत शासन निर्देशानुसार गणेश उत्सव साजरा केल्याने विविध गणेश मंडळांना स्थानिक पोलिस प्रशासनाअंतर्गत सन्मानित देखील करण्यात येते.

सिंदेवाही पोलिस ठाण्यांतर्गत ९२ गावांमध्ये गणेशोत्सव साजरा केला जाणार असल्याची माहिती देण्यात आली. उत्सवाअंतर्गत सर्वच गावांतील गणेश मंडळांनी विविध समाजोपयोगी कार्यक्रमाच्या आयोजनावर शांततेने हा उत्सव साजरा करण्याचे आवाहन पोलिस निरीक्षक विजय राठोड यांनी केले.

## प्रशांत कवासे सन्मानित

**मूल :** तालुक्यातील गडीसूर्ला येथील जिल्हा परीषद उच्च प्राथमिक शाळेतील विषय शिक्षक प्रशांत मधुकरराव कवासे यांना जिल्हास्तरीय शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. जिल्हा परिषदेच्या कन्नमवार सभागृहात त्यांना हा पुरस्कार बहाल करण्यात आला.






कापूस, सोयाबीन पिकाला जबर फटका

# साहेब ! पूर ओसरला आता मदतीचे काय ?

सुभाष भटवलकर
लोकमत न्यूज नेटवर्क

**विसापूर :** शेतकऱ्यांनी जीवाची बाजी लावून खरीप हंगामाची लागवड केली. शेतात कापूस, सोयाबीन, भाजीपाला व अन्य कडधान्य पिकांची लागवड केली. मात्र, अचानक वर्धा नदी शेतकऱ्यांवर कोपली. नदीला आलेल्या पुराने शेतशिवार जलमय झाले. यामुळे ऐन पोळ्याच्या दिवशी शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रू आले. आता तरी शासनाने तत्काळ मदत द्यावी, अशी आशा शेतकरी बाळगून आहेत.

बल्लारपूर तालुक्यातील खरीप हंगाम कोरडवाहू आहे. निसर्गाच्या जलचक्रावर शेतीचा हंगाम अवलंबून आहे. विसापूर, नांदगाव (पोडे), चारवट, हडस्ती, बामणी (दुधोली), दहेली, लावारी, कळमना, आमडी, पळसगाव, कोठारी, काटवली (बामणी) आदी गावांतील शेतशिवार वर्धा नदीच्या तिरालगत आहे. मात्र, रविवारी वर्धा नदीचा जलस्तर अचानक वाढला. त्यामुळे पूरपरिस्थिती निर्माण झाली. वर्धा नदीच्या पुराने शेतकऱ्यांच्या हातात येणारे पीक पाण्याखाली आले. यामुळे कापूस, सोयाबीन, भाजीपाला, भात व कडधान्य पिकांची नासाडी झाली आहे. शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला आहे. शेतकरी या अस्मानी संकटाने हतबल झाला आहे. आता पूर ओसरल्याने शासनाने त्वरित पंचनामे करून नुकसानभरपाई देऊन मदत करावी, अशी अपेक्षा बळीराजा करत आहे.



पूर ओसरत असताना शेतजमीन अशी खरडून निघाली होती.

> रविवारी अचानक वर्धा नदीला पूर आला. याला कारणीभूत शासकीय यंत्रणेचा गलथानपणा आहे. अपर वर्धा नदीवरील धरणातून पाण्याचा विसर्ग केल्याने नदीच्या पाण्याच्या पातळीत वाढ झाली. परिणामी, वर्धा नदीचा जलस्तर वाढला. पूरपरिस्थिती निर्माण झाली. यामुळे शेतातील उभ्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. शासनाने शेतकऱ्यांच्या पिकांच्या नुकसानाचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत द्यावी.
>
> **-रामभाऊ टोंगे,** माजी सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, चंद्रपूर

### हडस्ती येथील ९० टक्के शेती पाण्याखाली

अचानक आलेल्या पुराने तालुक्यातील शेतीची दैना केली आहे. हडस्ती येथील ९० टक्के शेती पाण्याखाली आल्याने संपूर्ण पीकच उद्ध्वस्त झाले आहे. निसर्गाचा जबर फटका बळीराजाला बसला आहे. वर्धा नदीचा पूर मानवनिर्मित संकटाला चालना देणारा आहे. शासनाने तत्काळ शेतीच्या नुकसानाचे पंचनामे करून मदत करावी, अशी आग्रही मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. याबाबत पालकमंत्र्यांनाही निवेदन देण्यात आले आहे.


लोकमत CLASSIFIEDS classified online
क्लिक करा बुक करा http://online.lokmatclassified.com

**नोकरीविषयक**

**नोकरीविषयक**

**शैक्षणिक क्षेत्रात कामाकरीता** मुलींची आवश्यकता आहे. MSCIT, Tally, टायपिंग येणे आवश्यक. 7410731412, 9172210776 (627015)

**पाहिजे. जी.एन.एम - 2,** ए.एन.एम - 2, सुपरवायझर- 1, स्विपर (पार्ट टाइम)- 1, 10 वी, 12 वी पास 4 मुली, चौकीदार- 1, कंपाउंडर- 1 ची आवश्यकता आहे. संपर्क- कोल्हे हास्पिटल, घुग्घुस (627148)

**संत्रिप्त बेकरीमध्ये पाव, केक,** कुकीज बनविण्यासाठी अनुभवी शेफ पाहिजे. संपर्कः संत्रिप्त फूड प्रॉडक्टस मु. कोजबी ता. नागभीड, चंद्रपूर. मो. 9158937527 (627161)

**दवाखान्यात काम करण्यासाठी** पुरुष पाहिजे. वयाची अट नाही. कस्तुरबा रोड चंद्रपूर. मो- 9373855771 मकरंद (627137)

**साऊथ इंडीयन होटल मध्ये काम** करण्याकरीता मुलगी/महिला पाहिजे. अनुभवाची गरज नाही. यम्मी टम्मी, एल. टी. वी. शाळेजवळ, आकाशवाणी सेंटर रोड, चंद्रपूर - 8793474483 (627470)

**ज्योतिषविषयक**

**ज्योतिष**

**बालाजी ज्योतिष जन्म पत्रिका,** संतान प्रॉब्लेम, लव धोका, वशिकरण, पती पत्नी भांडण, मूठकरणी, कोणत्याही समस्यावर 100% खात्रीपूर्वक इलाज फी 150 रु. बालाजी सभागृह जवळ चंद्रपूर. मो- 9689884479 (626470)

**लॉजिंग अँड बोर्डिंग**

**वसतीगृह**

**Accomodation available** for 4 girl students at Laxminagar Nagpur. 24 hrs Hot water. Contact 9699793939 (627204)

सुचना- आपली जाहिरात लगेच दुसऱ्या दिवसाच्या अंकात हवी असेल तर ती दुपारी २.३० वाजताच्या आधी लोकमत कार्यालयात देणे आवश्यक आहे.

जाहिरात छोटी प्राप्ती मोठी

अधिक माहितीकरिता संपर्क करा - लोकमत कार्यालय - योगेश वैद्य मो. 9503447441, 9890653064, वामा साडीज चंद्रपूर मो. 9922930152, 9922930154. खालील ठिकाणी पण छोट्या जाहिराती स्वीकारल्या जातात- भवानी ॲन्ड साईकृपा सर्व्हिसेस, एकोरी वार्ड, चंद्रपूर मो. 9975932068, मंदे न्युज पेपर एजन्सी पडोली, चंद्रपूर मो. 7767061109

## PUBLIC NOTICE

General public is hereby informed that our client, **M/s. Muthoot Finance Ltd. (GSTIN 32AABCT0343B1Z7), Registered Office: 2nd Floor, Muthoot Chambers, Banerji Road, Kochi- 682018, Kerala, India CIN: L65910KL1997PLC011300, Ph:+91 484- 2396478, 2394712, Fax : +91 484- 2396506 mails@muthootgroup.com, www.muthootfinance.com** is conducting Auction of ornaments **(NPA** accounts for the period up to **31.03.2023 & (Low Tounch/Low quality/Insufficient weight deduction accounts** for the period up to **31.03.2024)** , pledged in its favour, by the defaulting Borrowers, as detailed hereunder. All those interested may participate.

**First Auction Date: 17.09.2024**

